# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 09/03/2024 (शनिवार) सायंकाळ

---

### फसवणूक करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले जेरबंद

यातील फिर्यादी नामे— सौ सरला सरोज मोहती वय ४३ वर्ष रा. प्लाट न १७नेवारा सोसायटी प्रभाग क्र. १ बुट्टीबोरी यांनी दोन अनोळखी इसमांना आपल्या अंगावरील जुने वापरते सोन्याचे दागिने साफ करण्यास दिले असता नमूद दोन अनोळखी इसमांनी वरील नमूद दाग दागीने काढुन घेवुन फिर्यादीची फसवणुक करून सोन्याचे दागीने घेवुन गेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बोरी येथे अप क्र. २०३/२४ कलम ४२०, ४०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा केला होता.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेतला असता **आरोपी नामे— सुनिलकुमार सत्यनारायण शहा वय ४० वर्ष, रा. बिहार** यास पारडी शिवनगर येथुन आरोपीस ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता आरोपीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस दिनांक ०८/०३/२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन पुढील तपास बुट्टीबोरी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव ठाणेदार पोस्टे बोरी, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत लभाने, पोलीस हवालदार आशिष टेकाम, प्रविण देव्हारे, युनुस खान, पोलीस अंमलदार आशिष कछवा, दशरथ घुगरे, माधव गुट्टे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर